अमित गद्रे



## सौंदर्य खुलले...!

शिवाजी विद्यापीठाच्या इमारतीचे सौंदर्य सर्वांनाच मोहवून टाकते. त्यातच विद्यापीठासमोरील बागेत फुललेल्या सूर्यफुलांमुळे इमारती सौंदर्य अधिकच खुलून दिसत आहे.

# पदवी परीक्षांच्या निर्णयाबाबत विद्यापीठाने पुनर्विचार करावा

## एआयएसएफची प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्यातील पदवी व पदव्युत्तर परीक्षांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये असलेले संभ्रमाचे वातावरण दूर झाले आहे. यापैकी काही निर्णयांमुळे विद्यार्थी अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्याबाबत त्वरित पुनर्विचार व्हावा, अशी मागणी ऑल इंडिया स्टुडंटस फेडरेशन (एआयएसएफ) तर्फे विद्यापीठ प्रशासनाकडे ई मेल द्वारे निवेदन पाठवून करण्यात आली आहे.

निवेदनामध्ये म्हटले आहे, शेवटच्या वर्षातील जे विद्यार्थी परीक्षांना सामोरे जाणार आहेत, त्यांच्या संबंधित सत्रातील परीक्षांसोबत मागील बॅकलॉग तसेच एटीकेटी असल्यास त्या परीक्षा देखील घेण्यात याव्यात. अन्यथा एटीकेटी असल्याने विषयांच्या अनुषंगाने योग्य मूल्यमापन करण्याची पर्यायी यंत्रणा उभी करावी. जेणेकरून कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षाचे नुकसान होणार नाही. शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क देखील माफ करावे व अन्य विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क तत्काळ परत करावे.

शिवाजी विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांचा बॅकलॉग रिचेकिंगसाठी दिलेल्या पेपरचा लवकरात लवकर निकाल लावण्यात यावा आदी मागण्या करण्यात आल्या. निवेदनावर प्रशांत आंबी, धीरज कठारे, हरीष कांबळे यांच्या सहया आहेत.

**शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागाचे माजी प्रमुख प्रा. डॉ. वसंत शंकर तथा व्ही. एस. कदम यांचा आज (ता. १४) प्रथम स्मृतिदिन. या निमित्त त्यांच्या पत्नी श्रीमती सुनीला कदम यांनी स्मृतींना दिलेला उजाळा...**

# मृदू अंत:करणाचा कठोर संशोधक


व्ही. एस. कदम

**स्मरण**

कोल्हापुरातील देशपांडे गल्लीतील कदम सराफ यांच्या वाड्यात १९३८ साली कदम यांचा जन्म झाला. घराजवळील शाळेत त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. राजाराम महाविद्यालयातून बी.ए.ची पदवी घेतली. घरची शेती व सराफी असूनही त्यांनी शिक्षण क्षेत्रातच पुढे जायचे ठरविले. इतिहास विषयातून पुणे विद्यापीठात एम.ए. झाले. कोल्हापूरमधील राजाराम महाविद्यालयातच त्यांना अध्यापन करण्याची संधी लाभली. त्याच सुमारास कोल्हापुरात शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली होती. तेथे इतिहासाचे अध्यापक म्हणून ते रुजू झाले. १९६८ ते १९९९ म्हणजे अगदी निवृत्तीपर्यंत त्यांनी इतिहासाचे लेक्चरर, रीडर, प्रोफेसर म्हणून काम केले.

या अधिविभागाचे प्रमुख म्हणून काम केले. त्या पदावरूनच एप्रिल १९९९मध्ये सेवानिवृत्त झाले. पीएचडीसाठी त्यांनी 'मराठा कन्फेडरसी: अ स्टडी ऑफ इट्स ओरिजीन अँड डेव्हलपमेंट' या विषयावर पुणे विद्यापीठात विद्यापीठास शोधप्रबंध सादर केला. या प्रबंधाला युजीसीचे अनुदान मिळाले आणि तो ग्रंथरुपाने प्रसिद्धही झाला. त्यांची अभ्यासू वृत्ती, वाचनाची प्रचंड आवड, विषयाचे खोलवर जाऊन परीक्षण, सतत चर्चा, लिखाण इत्यादी उपक्रमांत त्यांचा दिनक्रम व्यस्त असे. देश-विदेशांतील अनेक चर्चासत्रांसाठी त्यांना आमंत्रित केले जात असे. त्यांचे अनेक लेख परदेशी जर्नल्समधून प्रकाशित झाले.

आंतरराष्ट्रीय स्तरावर इतिहास संशोधक म्हणून त्यांची ख्याती झाली. इंग्रजीवरही त्यांचे उत्तम प्रभुत्व होते. त्यांचे बरेचसे लेखन त्यामुळे इंग्रजीतूनच असे. 'हू ज हू इन द वर्ल्ड' या अमेरिकेतून प्रसिद्ध होणाऱ्या जर्नलमध्येही त्यांच्याविषयी माहिती प्रसिद्ध झाली. ही त्यांच्या संशोधनकार्यांची पोचपावतीच होती.

अभ्यास आणि व्यासंगातून आलेला आत्मविश्वास, अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्याची धमक, समाजातील न रुचणाऱ्या प्रथा, अंधश्रद्धा यावर परखड मते मांडत टीकाकाराची भूमिकाही ते निष्ठेने पार पाडत. वरून कठोर, पण आतून मृदू असे त्यांचे अंत:करण होते. शांत, संयमी, धीरगंभीर, मितभाषी असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते, त्याचवेळी जशास तसे वागण्याचा निर्भिड बाणेदारपणाही त्यांच्यात होता. सरांच्या सहवासातील अनेक आठवणी मनी दाटून येत आहेत. कोल्हापुरातील एका गल्लीपासून ते जागतिक कीर्तीला संशोधक होण्यापर्यंतचा त्यांचा असामान्य प्रवास इतिहास संशोधकांच्या भावी पिढ्यांना कायम प्रेरणा देत राहील.